## ऋतुजा लटकेंना काँग्रेसचा विरोध; पदाधिकाऱ्यांचे राजीनामास्त्र

**मुंबई :** अंधेरी पोटनिवडणुकीची रंगत हळूहळू वाढत चालली आहे. या दरम्यान शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवार ऋतुजा लटकेंविरोधात महाविकास आघाडीतील पक्ष काँग्रेस आक्रमक झाला आहे. अंधेरी पोटनिवडणुकीत काँग्रेसने उमेदवार न दिल्यामुळे पदाधिकाऱ्यांनी राजीनामा सत्र सुरू केले आहे. अंधेरी पूर्व मतदारसंघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला असून या अगोदर दोन वेळा काँग्रेसचे सुरेश शेट्टी या मतदासंघातून आमदार आणि मंत्री राहिले आहेत. अंधेरीत उमेदवार न देऊन पक्ष आपल्या कार्यकर्त्यांचे मनोबल कमी करण्याचे काम करीत असल्याचे काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सदस्य विश्वबंधू राय यांनीही आता राजीनामा दिला आहे. काँग्रेसमधील नाराजीमुळे शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवार ऋतुजा लटके यांच्या अडचणी वाढणार आहेत.


सोमवार, १७ ऑक्टोबर २०२२

◆ वर्ष १५ ◆ अंक ९०

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


### अंतरंग


नवी मुंबई आयुक्तालय हद्दीतील पोलिसांच्या बदल्या/३

बेलापूर-जेएनपीटी वॉटर टॅक्सीसेवा आजपासून सुरू/६

पेणमध्ये रस्तेविषयक मागण्यांसाठी आंदोलन/७


# आरोग्य महाशिबिराचा 10,500हून अधिक जणांना लाभ

## लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर व सहकारी सातत्याने समाजसेवा करताहेत -ना. रवींद्र चव्हाण

**पनवेल : हरेश साठे**

**प्रथा आणि परंपरेने सर्व समाजाची सातत्याने निस्वार्थीपणे सेवा करण्याचे काम माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, त्यांचे सहकारी आणि पक्ष करीत आहे, असे गौरवोद्गार राज्याचे सार्वजनिक बांधकाम आणि अन्न व नागरी पुरवठामंत्री रवींद्र चव्हाण यांनी रविवारी (दि. १६) खांदा कॉलनी येथे काढले. उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या या महाशिबिराचा तब्बल १० हजार ५००हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला.**



देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. या अंतर्गत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ पनवेल, भाजप पनवेल आणि रायगड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयात १३वे मोफत आरोग्य तपासणी व औषधपचार वाटप महाशिबिर झाले. या महाशिबिराचे उद्घाटन मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्यासह इतर लोकप्रतिनिधींच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्या वेळी ना. चव्हाण बोलत होते.

या महाशिबिरास प्रमुख मान्यवर म्हणून सुप्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे, डॉ. समीर सहस्त्रबुद्धे तसेच श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव परेश ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, युवा नेते विनोद साबळे, रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आदेश पाथरे, माजी उपमहापौर चारुशीला घरत, सीताताई पाटील, भाजप खारघर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्ष वर्षा नाईक, माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, हरेश केणी, डॉ. अरुणकुमार भगत, मनोज भुजबळ, प्रकाश बिनेदार, मनोहर म्हात्रे, बबन मुकादम, संदीप पाटील, तेजस कांडपिळे, अजय बहिरा, विजय चिपळेकर, राजू सोनी, प्रवीण पाटील, शत्रुघ्न काकडे, अमर पाटील, मुकीत काझी, निलेश बाविस्कर, नरेश ठाकूर, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका सुशीला घरत, दर्शना भोईर, वृषाली वाघमारे, राजेश्री वावेकर, नीता माळी, कुसुम म्हात्रे, प्रमिला पाटील, मोनिका महानवर, कल्पना ठाकूर, हेमलता म्हात्रे, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, राज पाटील, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, सरचिटणीस दशरथ म्हात्रे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, शहराध्यक्ष रोहित जगताप, सांस्कृतिक सेलचे जिल्हा संयोजक अभिषेक पटवर्धन, शशिकांत शेळके, अल्पसंख्याक सेलचे प्रदेश सचिव मन्सूर पटेल, डॉ. संतोष आगलावे, डॉ. कृष्णा देसाई यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.



(अधिक छायाचित्रे पान ३ व ८वर.. )

**या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा**

मंत्री रवींद्र चव्हाण यांनी पुढे बोलताना सांगितले की, गेली अनेक वर्षे पनवेल व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांची सेवा सातत्याने भव्य अशा या आरोग्य महाशिबिरातून केली जात आहे. हजारो रुग्ण या महाशिबिराचा लाभ घेत असतात. सर्वच प्रकारच्या आजारांवर या ठिकाणी उपचार आणि औषधोपचार केले जात आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर दानशूर व्यक्तिमत्त्व आहेत. येथील नागरिकांना काय हवे आहे याची जाणीव ठेवत सामाजिक बांधिलकीने त्यांच्या नेतृत्वाखाली कार्य केले जात आहे. देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जेव्हापासून सरकार आले त्यापासून गरीब मध्यमवर्गीय नागरिकांना आरोग्य व्यवस्था देण्याचे काम होत आहे. त्या अंतर्गत आयुष्यमान भारत योजनेचा लाभ कोट्यवधी नागरिक घेत आहेत. त्याचबरोबर राज्यात महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना आणि इतर योजना, सुविधा उपलब्ध करून देत आयुष्याला मदत देण्याचे काम होत आहे.

या महाशिबिरात फक्त सर्वसाधारण रोगांवर नाही तर कॅन्सर, हृदयविकार, नेत्र तपासणी, महिला व लहान मुलांचे आजार, दिव्यांगांना व्हीलचेअर, हात किंवा पाय नसलेल्यांना जयपूर फूट असे विविध आरोग्यदायी सेवा उपलब्ध होत असून नागरिकांना ही सेवा संपूर्ण मोफत देण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी व त्यांचे सहकारी करीत आहेत. त्यामुळे हे फक्त महाशिबिर नसून सेवेचा अखंड महायज्ञ आहे, असेही ना. रवींद्र चव्हाण यांनी अधोरेखित केले. त्याचबरोबर त्यांनी या वेळी महाशिबिराची पाहणी करून आढावा घेतला आणि अत्यंत उत्कृष्ट नियोजन असल्याची पोचपावती दिली.

> **श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ माझ्या नावाने स्थापन झाले आणि त्या माध्यमातून लोकांची सेवा अखंडपणे केली जात आहे याचा आपल्याला आनंद आहे.**
> **-लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार**

दरवर्षी भव्य स्वरूपात हे महाशिबिर होत असते. किमान १० हजार नागरिक या शिबिराचा लाभ घेत असतात. विशेष म्हणजे या शिबिरात असाध्य आजारांवही उपचार केले जाते. शिबिर यशस्वी करण्यासाठी विविध रुग्णालयांचे डॉक्टर व त्यांचे सहकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक, समाजसेवक मेहनत घेत असतात. त्यामुळे त्यांच्याप्रती लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून आदर व्यक्त केला.

सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांचे रायगड जिल्ह्यावर विशेष प्रेम आहे. त्याचप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही आपल्या जिल्ह्यावर प्रेम आहे, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आवर्जून नमूद केले.

या महाशिबिराचा १० हजार ५००हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. त्यांना मोफत आरोग्य तपासणी आणि औषधोपचार देण्याबरोबरच भोजन व्यवस्थाही करण्यात आली होती. त्यासाठी शेकडो स्वयंसेवक तसेच कार्यकर्ते सज्ज होते. **(पान २ वर..)**

## हृदयविकारावर चित्रफित व प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन

**पनवेल : नितीन देशमुख**

हल्ली हृदयविकारासंबंधी अनेक तक्रारी उद्भवल्याचे दिसून येते. काहींना हृदयविकाराचा झटका येऊन वेळीच रुग्णवाहिका व उपचार न मिळाल्याने प्राणही गमवावा लागतो. ते लक्षात घेता बंद पडलेला श्वासोच्छवास कसा सुरू करायचा याबद्दल आरोग्य महाशिबिरात रोटरी क्लब डिस्ट्रिक ३१३१च्या माध्यमातून प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले.

एखाद्या व्यक्तीची हृदयक्रिया बंद पडल्यास त्याला जोपर्यंत वैद्यकीय मदत मिळत नाही किंवा रुग्णवाहिका येत नाही तोपर्यंत सामान्य माणूस म्हणून आपण काय करू शकतो तर त्याच्या हृदयाच्या पंपिंगचे कार्य सुरू करण्यासाठी पुनरूत्थान करायचे आहे. त्याला रस्त्यावर सपाट जागी झोपवून आपण केवळ दोन हातांच्या साह्याने पंपिंग करून त्याची हृदयक्रिया कशी सुरू ठेवायची याची माहिती चित्रफित व प्रात्यक्षिकासह डॉ. प्रितेश बागूल, एमजीएम रुग्णालयाचे डॉ. दत्तात्रय भुसारे आणि डॉ. रामकृष्णन यांनी दिली. या कार्यशाळेचा अडीचशे ते तीनशे जणांनी लाभ घेतला.

### शिबिरार्थी म्हणतात...

**मी पेंटरचे काम करीत होतो. चार वर्षांपूर्वी पेंटिंगचे काम करताना वरून पडलो. त्या वेळी पाय दुमडला गेला. त्यामुळे मला चालता येत नाही. सरकत सरकत जावे लागते. त्यामुळे अनेक वेळा जखमा होतात. त्याचा खूप त्रास होतो, परंतु या महाशिबिरात ही खुर्ची मिळाल्याने मला खूप बरे वाटले. माझा त्रास कमी होणार आहे. त्यामुळे मी आमदार प्रशांत ठाकूरसाहेबांना धन्यवाद देतो.**
**-भारत गायकर, केवाळे, पनवेल**

**मला हृदयविकारचे तीन झटके आले होते. माझी बायपास झाली आहे. मला १० वर्षे ऐकायला येत नाही. यापूर्वी मला इथेच आमदारसाहेबांनी मशीन दिले होते, पण ते पाण्यात भिजले. त्यामुळे बंद पडले. माझी पत्नी मंदा हिलासुद्धा ऐकू येत नाही. त्यामुळे आम्ही महाशिबिरात आलो. आता मशीन मिळाल्याने आम्ही दोघे एकमेकांचे बोलणे ऐकू शकतो याचा नक्कीच आनंद झाला आहे. आमदार प्रशांत ठाकूरसाहेबांचे आम्ही आभारी आहोत.**
**-दत्तात्रय गायकवाड, अजिवली, पनवेल**

**मी डोळे तपासायला आले होते. ते तपासून झाले. मला चष्मा देण्यात आला. आता कान आणि गुडघे दुखतात तेही तपासायचे आहे. या ठिकाणी जेवणाचीदेखील व्यवस्था छान केली आहे. गर्दी असूनही गडबड, गोंधळ नाही. जेवणही चांगले आहे.**
**-आशा पाटील, छोटा खांदा, पनवेल**

## निवडक

### दिल्लीच्या उपमुख्यमंत्र्यांना समन्स; आज चौकशी

**नवी दिल्ली :** अबकारी घोटाळाप्रकरणी दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग म्हणजेच सीबीआयकडून समन्स बजावण्यात आले आहे. त्यांना सोमवारी (दि. १७) सकाळी ११ वाजता चौकशीसाठी बोलाविण्यात आले आहे. दारू धोरण सिसोदियांना भोवू शकते.

### वर्ल्डकपमध्ये मोठा उलटफेर! नामिबियाचा श्रीलंकेवर विजय

**सिडनी :** टी-२० क्रिकेट विश्वचषकात रविवारी (दि. १६) झालेल्या पहिल्या सामन्यात आशिया चषक विजेत्या श्रीलंका संघाला दुबळ्या नामिबियाने ५५ धावांनी हरविले. प्रथम फलंदाजी करताना नामिबियाने १६३ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात श्रीलंकेचा डाव १९ षटकांत १०८ धावांवर आटोपला.

### कुख्यात गुंड गज्या मारणेच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या

**सातारा :** पुण्यातील कुख्यात गुंड गजानन उर्फ गज्या मारणे याला पुणे पोलिसांनी अटक केली आहे. साताऱ्यातील वाईजवळील एका फॉर्महाऊसवरून पोलिसांनी गजाला बेड्या ठोकल्या.

## ग्रामपंचायत निवडणुकीसाठी रायगडात शांततेत मतदान

### आज मतमोजणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात १६ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी रविवारी (दि. १६) तुरळक घटना वगळता मतदान प्रकिया शांततेत पार पडली. थेट सरपंचपदाच्या १६, तर सदस्यांच्या १८४ जागांसाठी मतदान झाले. सोमवारी (दि. १७) मतमोजणी होणार आहे.

मतदानास सकाळी ७.३० वाजल्यापासून सुरुवात झाली. सकाळी मतदारांचा उत्साह फारसा नव्हता. ११नंतर मतदान केंद्रावर गर्दी दिसू लागली. त्यानंतर दुपारी आणि संध्याकाळी मतदारांच्या रांगा पहायला मिळाल्या. जिल्ह्यात ६१ मतदान केंद्र उभारण्यात आली होती. तेथे ३०९ कर्मचारी नेमण्यात आले होते. मतदान प्रक्रिया शांततेत पार पडावी म्हणून सर्वच केंद्रांवर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

मागील दोन आठवडे ग्रामपंचायत निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा उडत होता. आश्वासनांच्या माध्यमातून मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा उमेदवारांनी प्रयत्न केला. आता कोणाचा जोर किती कामाला आला याचे उत्तर सोमवारी होणाऱ्या मतमोजणीतून समोर येणार आहे.



(छाया : जितू शिगवण)

## पनवेलमध्ये 'आयएनएस विक्रांत'ची प्रतिकृती

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन; नागरिकांची गर्दी

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देशात प्रथमच घरोघरी तिरंगा झेंडा फडकला. त्यामुळे या वर्षीची दिवाळीदेखील विशेष असून नागरिकांच्या मनामनात राष्ट्रभक्तीची ज्योत चेतवण्यासाठी पनवेल शहरात ओरियन मॉलमध्ये भारतीय नौदलातील युद्धनौका आयएनएस विक्रांतची प्रतिकृती उभारण्यात आली आहे. या प्रतिकृतीचे उद्घाटन भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. १५) झाले.

उद्घाटन समारंभास महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजप ओबीसी सेल उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, बँक ऑफ महाराष्ट्राच्या नवी मुंबई व रायगड विभाग महाव्यवस्थापक अपर्णा जोगळेकर, निवृत्त नेव्हल ऑफिसर कमांडर जसबीर सिंग, ओरियन मॉलचे मालक मंगेश परूळेकर, संचालक मनन परूळेकर, संस्कार भारतीचे डॉ. शैलेश भेंडे, प्रतिकृती साकारणारे सिद्धार्थ साठे, ॲड. अमित चव्हाण, विजय काळे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



(छाया : योगेश पाटील)

> **पनवेलकरांसाठी ऐन दिवाळीत ओरियन मॉलमध्ये 'आयएनएस विक्रांत'ची प्रतिकृती ही चांगली भेट आहे. अनेक वेळा आपण प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन ती पाहू शकत नाही, परंतु आज या प्रतिकृतीतून तिची भव्यता व इतिहास नक्कीच डोळ्यांसमोर तरळतो.**
> **-आमदार प्रशांत ठाकूर, भाजप रायगड जिल्हाध्यक्ष**

> **बँक ऑफ महाराष्ट्राला ही एक चांगली संधी मिळाली आहे. या प्रतिकृतीला उभारण्यासाठी हातभार लावण्याचे सौभाग्य आम्हाला लाभले. आजच्या तरुण पिढीने मॉलमध्ये खरेदी करताना आवर्जून या प्रदर्शनाला भेट द्यावी व यातून देशभक्तीची स्फूर्ती घ्यावी.**
> **-अपर्णा जोगळेकर, महाव्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, नवी मुंबई व रायगड विभाग**

भारताची पहिली युद्धनौका म्हणून ओळख असलेल्या आयएनएस विक्रांतची युद्धकाळात महत्त्वाची भूमिका राहिली आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त चला... दिपावलीचा आनंद द्विगुणित करूया, मनामनातील दीप उजळूया, राष्ट्रभक्तीची ज्योत चेतवूया या घोषवाक्याचा आधारे 'आयएनएस विक्रांत'ची प्रतिकृती ओरियन मॉलमध्ये उभारण्यात आली आहे. **(पान २ वर..)**

# मयत कामगाराच्या कुटुंबीयांना भाजपमुळे न्याय

## उरणमध्ये कंपनीकडून मिळवून दिली १० लाखांची आर्थिक मदत

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

उरण तालुक्यातील बोकडविरा येथील महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीच्या जीटीपीएस संयंत्रातील बॉयलर ऑपरेशन विभागात भीषण स्फोट झाला होता. भाजप पदाधिकाऱ्यांनी कंपनी प्रशासनाला धारेवर धरून मयत झालेल्या विष्णू यशवंत पाटील या कामगाराच्या परिवाराला आर्थिक मदत मिळवून दिली आहे.




भीषण स्फोटात कनिष्ठ अभियंता विवेक धुमाळे (वय ३४), तंत्रज्ञ कुंदन कमलाकर पाटील (वय ४३) आणि कंत्राटी कामगार विष्णू यशवंत पाटील (वय ४३) हे गंभीररित्या जखमी झाले होते. त्यापैकी कुंदन कमलाकर पाटील आणि विष्णू यशवंत पाटील हे गंभीररित्या भाजल्यामुळे ऐरोली येथील नॅशनल बर्न सेंटर या इस्पितळात उपचार घेत होते तर कनिष्ठ अभियंता विवेक धुमाळे यांचे तत्काळ निधन झाले. जखमी कामगारांना तत्काळ चांगले आणि योग्य उपचार मिळावे यासाठी बोकडवीराचे सरपंच मानसी देवेंद्र पाटील, माजी सरपंच भगवान पाटील, कॉ. जयवंत पाटील, जि. प. सदस्य विजय भोईर, व्यावसायिक सदानंद गायकवाड, दर्शन घरत, ॲड. विजय पाटील, राजू पाटील, फुंडेचे सरपंच सागर घरत, भेंडखळचे सरपंच लक्ष्मण ठाकूर आणि अन्य ग्रामस्थ यांनी कंपनी व्यवस्थापनावर दबाव आणून तत्काळ उपाययोजना करण्यास दबाव आणला. इस्पितळात गेल्यावर सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार आणि जि. प. सदस्य विजय भोईर यांनी प्रशासनास विचारणा केली असता कामगारांची संपूर्ण उपचाराची जबाबदारी घ्यायचे प्रशासनाने मान्य केले, परंतु दुर्दैवाने कंत्राटी कामगार विष्णू यशवंत पाटील आणि कुंदन कमलाकर पाटील यांचे उपचारादरम्यान दुर्दैवी निधन झाले.

जे कामगार कंपनीच्या पे-रोलवर होते, त्यांचीदेखील जबाबदारी घेण्यास प्रशासनाने नकार दिला. ज्यांनी कर्त्तव्य बजावताना आपले प्राण गमावले त्यांना सुद्धा प्रशासनाने वाऱ्यावर सोडले. तर कंत्राटी कामगार विष्णू यशवंत पाटील यांच्या उपचारावरील खर्च देण्यास कंपनीने नकार दिला. या कृत्यामुळे कंपनी प्रशासन विरुद्ध प्रचंड संताप व्यक्त करण्यात आला.प्रशासनाची दलाली करणारे तथाकथित कामगार नेते आणि कार्यसम्राट कंपनीचे दलाल मात्र प्रशासनाची बाजू सावरतांना दिसले याचा तीव्र राग स्थानिक आणि कामगारात आहे. या गोष्टीची प्रचंड चीड येऊन भाजपाच्या कार्यकर्त्यांनी प्रशासनाला जाब विचारत कायदेशीर कारवाई करून प्रशासनाच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा असा पोलीस यंत्रणेकडे आग्रह धरला. यासाठी योग्य ते मार्गदर्शन ॲड. विजय पाटील यांच्या कडून घेणार असल्याचे ठरले. त्यावेळी ताळ्यावर येत उपस्थित अधिकारी, मुख्य अभियंता सुनील इंगळे, अभियंता गरुड व त्यांचे मानव संसाधानाचे वरिष्ठ अधिकारी यांनी तातडीची सर्व कंत्राटदाराची सभा घेऊन मयत कामगारासाठी आर्थिक मदत करावी आणि त्या मोबदल्यात आम्ही तुमच्यावर कृपा दृष्टी ठेऊ असे सांगितले. या सहकार्यातून जमलेली रक्कम ही संबधित कंत्राटदारामार्फत मृत कामगाराच्या परिवारास देण्याचे सुचविले. संबधित कंत्राटदाराने अपघातास आम्ही जबाबदार नसून संपूर्ण जबाबदारी ही संबधित अधिकाऱ्यांची आहे असे ठणकावले आणि या प्रस्तावाला नकार देत जी मदत आहे ती महाजेनकोच्या माध्यमातूनच व्हावी आणि मृत कामगारांच्या परिवारास पुनर्वसनासाठी त्यांच्या वारसांना कायमस्वरूपी नोकरी मिळाली पाहिजे असा आग्रह धरला.

> **कंत्राटी कामगारांसाठी कंपनी प्रशासनाने योग्य अशी अपघात सहाय्य पॉलिसी बनवावी आणि कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न सोडवावेत. यासाठी संबधित कायद्याची आणि सुरक्षेची प्रक्रिया राबवावी. येत्या हिवाळी अधिवेशनात हा मुद्दा आग्रहाने मांडू.**
> **-महेश बालदी, आमदार**

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन योग्य त्या उपाययोजना व्हाव्यात. या अपघातासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अपघातात मृत कामगारांच्या परिवाराचे पुनर्वसन व्हावे इत्यादी मागण्यांसाठी आमदार महेश बालदी यांच्याशी भाजप पदाधिकाऱ्यांनी त्वरित संपर्क साधून यात जातीने लक्ष घालून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी केली. आमदारांनी याचा वरिष्ठ पातळीवरून पाठपुरावा करून दोषींवर कारवाई करून भविष्यात अपघाताची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत.

तसेच, उर्जा मंत्रालयाचे मुख्य सचिवांशी सविस्तर चर्चा झालेली असून ह्या अपघातास जबाबदार असणाऱ्या सर्व संबधित अधिकाऱ्यांवर उच्चस्तरीय विभागीय चौकशी समिती नेमण्याची कार्यवाही सुरू केलेली आहे.

# नवी मुंबई आयुक्तालय हद्दीतील ४७१ पोलिसांच्या बदल्या



**पनवेल : वार्ताहर**

पाच वर्षांचा कालावधी पूर्ण केलेल्या नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील ४७१ पोलीस अंमलदारांच्या नवी मुंबई पोलिसांच्या आस्थापना मंडळाने अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये श्रेणी पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस शिपाई यांचा समावेश आहे.

राज्य सरकारने दिलेल्या आदेशानुसार पाच वर्षांचा कालावधी पूर्ण केलेल्या नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील ४७१ पोलीस अंमलदारांच्या नवी मुंबई पोलीस आस्थापना मंडळाने अंतर्गत बदल्या केल्या आहेत. यात पोलीस ठाणे, नियंत्रण कक्ष, पोलीस मुख्यालय, वाहतूक शाखा, गुन्हे शाखा, आरबीआय, अतिक्रमण आणि विशेष शाखेत कार्यरत पोलीस अंमलदारांचा या बदलीमध्ये समावेश आहे. सर्व कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तक तपासणीअंती पाच वर्षांचा कालावधी पूर्ण केलेल्या ४७१ कर्मचाऱ्यांची यादी पोलीस आयुक्तालयातील आस्थापना मंडळाने तयार केली. त्यानंतर पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह यांनी त्यावर सह्या केल्या.

> **नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील पाच वर्षांचा कालावधी पूर्ण केलेल्या पोलीस अंमलदारांच्या बदल्या या नवी मुंबई पोलिस आस्थापन मंडळाच्या शिफारशीनुसार करण्यात आल्या आहेत. तसेच अंमलदारांनी दिलेल्या तीन पसंतीक्रमानुसार बदल्या झाल्या आहेत.**
> **-अभिजित शिवथरे, पोलीस उपायुक्त, (मुख्यालय), नवी मुंबई**

यामध्ये श्रेणी पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस शिपाई यांचा समावेश आहे. बदली झालेल्या अंमलदारांमध्ये १६ श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, १५ सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, १४४ पोलीस हवालदार, ९४ पोलीस नाईक, १९७ पोलीस शिपाई त्याचप्रमाणे कसुरीवरून झालेल्या पाच कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.



**पनवेल : हार्ड हिटर्सच्या वतीने आमदार चषक २०२२ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन सुमित झुंजारराव यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. सुकापूर येथील टर्फ मैदानात ही स्पर्धा दोन दिवस सुरू होती. या स्पर्धेत १६ संघांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन महापालिकचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी झाले. या वेळी माजी नगरसेवक नितीन पाटील, आयोजक सुमित झुंजारराव, निसार सय्यद यांच्यासह खेळाडू उपस्थित होते.**
(छाया : योगेश पाटील)

# इमारतीच्या तोडकामादरम्यान एकाचा मृत्यू; तर एक जण जखमी

**पनवेल :** कामोठे वसाहतीमधील धोकादायक घोषित करण्यात आलेल्या एका इमारतीच्या पाडकामादरम्यान झालेल्या अपघातात एका पोकलेनचालकाचा मृत्यू झाला आहे. तर एक जण जखमी झाला आहे.

कामोठे वसाहतीमधील सेक्टर ३५ येथे असलेली ब्लू हेवन ही इमारत राहण्यासाठी महापालिकेने सन २०१९-२० साली धोकादायक ठरवण्यात आली होती. पालिकेने दिलेल्या नोटीसीनंतर या इमारतीच्या पाडकामाची कारवाई विकसकाकडून सुरू होती. या कामादरम्यान घडलेल्या दुर्घटनेत मुजिबूर रहमान या पोकलेन चालकाचा मृत्यू झाला तर आफताब जहांगीर हा जखमी झाला आहे. दरम्यान, कामोठे पोलीस ठाण्यात पोकलनचालकाच्या मृत्यूप्रकरणी ब्ल्यू हेवन सोसायटीचे पदाधिकारी व कॉन्ट्रॅक्टरविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे उरणमध्ये पथसंचलन

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

हिंदूचे जगातील सर्वांत मोठी संघटना म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सर्वांना सुपरिचित आहे. सर्व जाती धर्माचे व्यक्ती आज संघात कार्यरत आहेत. संघाच्या एकूण महत्वाच्या कार्यक्रमापैकी पथसंचलन हा एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे दरवर्षी पथसंचलनाचे आयोजन संपूर्ण देशात करण्यात येते. रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातही दरवर्षी पथ संचलनाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी उरणमध्ये रविवारी (दि. १६) उरण शहरात सकाळी ९ वाजता पथसंचलन काढण्यात आले.



सर्वप्रथम सर्व स्वयंसेवक उरण शहरातील देऊळवाडी येथील संघस्थान येथे एकत्र जमले. एकत्र जमल्यानंतर संघाची प्रार्थना झाली.

त्यानंतर देऊळवाडी येथून पथसंचलनाची सुरुवात झाली.हे पथसंचलन देउळवाडी, गणपती चौक-राजपाल नाका- चारफाटा-बालई-बाझारपेठ-राजपाल नाका स्वामी विवेकानंद चौक, एन आय हायस्कूलमार्गे परत मूळ स्थानी देऊळवाडी या मार्गाने पथसंचलन झाले. या वेळी ५४ स्वयंसेवकांनी पूर्ण गणवेश घालून यात सहभाग घेतला व इतर १९ मान्यवर असे एकूण ७३ स्वयंसेवक या पथसंचलनात सहभागी झाले होते. पंथसंचलन शांततेत व मोठ्या उत्साहात झाले.

या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ उरण तालुका कार्यवाह दर्शन पाटील, सहकार्यवाह भरत पाटील, मुख्यशिक्षक गोपाल प्रजापती, जिल्हा संपर्क श्रीपाद कातरणे, जिल्हा कार्यालय प्रमुख स्वप्निल रावते, जिल्हा महाविद्यालयीन प्रमुख पुष्कर सहस्त्रबुद्धे, व्यवस्था प्रमुख पुरुषोत्तम सेवक, भाजप उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, नगरसेवक राजू ठाकूर, उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरिक्षक (गुन्हे) सुहास चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिरुद्ध गिजे, पोलिस कर्मचारी युवराज जाधव उपस्थित होते.

# पनवेलमध्ये वर्षावास धम्म प्रवचन मालिकेची सांगता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय बौध्द महासभा, रायगड जिल्हा अंतर्गत तालुका शाखा पनवेल यांच्यावतीने शुक्रवारी (दि. १४) सायंकाळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन या ठिकाणी वर्षावास धम्म प्रवचन मालिका सांगता समारोप कार्यक्रम उत्साहात करण्यात आला.



कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेच्या पनवेल शाखेचे अध्यक्ष सुनील वाघपंजे यांनी प्रास्ताविक केले व संस्थेच्या आजपर्यंतच्या कामाची माहिती सांगितली. पूज्य भन्ते महेंद्र बोधी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिलेले संस्थेचे ट्रस्टी तथा राष्ट्रीय महसचिव व्ही. एस. मोखले यांनी आपले परखड विचार मांडून उपस्थितांस बौध्द धम्माविषयी सजग होण्यास सांगितले. संस्थेचे महाराष्ट्राचे अध्यक्ष महेंद्र मोरे यांनीही उत्तम मार्गदर्शन करीत संस्थेच्या धम्मकार्याचे कौतुक केले तसेच संस्थेचे रायगड जिल्हाध्यक्ष काशिनाथ कांबळे यांनीही मार्गदर्शन करताना संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे आणि कष्टाची दखल घेत त्यांना प्रोत्साहित केले.

या कार्यक्रमात संस्थेचे महाराष्ट्र कोषाध्यक्ष व धम्म प्रवचनकार स. जा. कवडे यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धम्मक्रांती' या विषयावर उत्कृष्ट प्रवचन दिले. त्यात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनेक पैलू श्रोत्यांसमोर ठेवून बौध्द धम्म प्रचार व प्रसार करण्याचे आवाहन केले. या वेळी ॲड. पी. एल. गायकवाड, ॲड. राजेश अनंत खंडागळे, ॲड. मिनल जयभीम जंगलबाग, ॲड. रोशन धर्मानंद कांबळे, ॲड. प्रणाली बापू सोहनी, ॲड. विशाखा काशिनाथ कांबळे, ॲड. विनोद जयसिंग झेंडे, ॲड. निलम प्रफुल भोसले, ॲड. अंगद निवृत्ती भोसले, ॲड. उत्कर्षा सुरेश सोनावले, ॲड. अस्मिता कांबळे, ॲड. मयुर राजेंद्र कांबळे, ॲड. दिपाली अंकुश गायकवाड आदी वकिलांचा सन्मान करण्यात आला.

सुत्रसंचालन पनवेल तालुका सरचिटणीस राहुल गायकवाड यांनी केले. या कार्यक्रमास रायगड जिल्हातील प्रत्येक शाखेतील पदाधिकारी, कार्यकर्ते, सभासद तसेच उपासक-उपासिका आवर्जुन उपस्थित होते.













**पनवेल : सीकेटी महाविद्यालयात रविवारी मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार वाटप महाशिबिर झाले. या महाशिबिराचे उद्घाटन सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्यासह इतर लोकप्रतिनिधींच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या वेळी भाजप पदाधिकारी, माजी नगरसेवक, नगरसेविका, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## संपादकीय

# भूक निर्देशांकाचा सावळागोंधळ

भूक निर्देशांकामध्ये भारताची परिस्थिती बिकट असल्याचे जागतिक अहवालात नमूद करण्यात आले आहे. अहवालात भारताला १०७वे स्थान मिळाल्यानंतर केंद्र सरकारने आपली बाजू मांडली आहे. या अहवालात चुकीची पद्धती वापरल्याची टीका भारताने केली असून अहवाल देशाची प्रतिमा मलिन करण्याच्या प्रयत्नांचा भाग असल्याचा आरोपही केला आहे.

**जागतिक पातळीवर भुकेच्या प्रमाणाचे मोजमाप करण्यासाठी कन्सर्न वर्ल्डवाइड ॲण्ड वेल्थंगरहिल्फ या संस्थेतर्फे दरवर्षी वैश्विक भूक निर्देशांक प्रकाशित केला जातो. राष्ट्रीय, प्रादेशिक, स्थानिक अशी त्याची वर्गवारी केली जाते. भूक निर्देशांकात १२१ देशांच्या क्रमवारीत भारताची १०७व्या स्थानी घसरण झाली असल्याचे सांगत भारताला गंभीर श्रेणीमध्ये टाकण्यात आले आहे. या निर्देशांकात २०२१ साली भारताचे ११६ देशांमध्ये १०१वे स्थान होते, तर २०२० साली देश ९४व्या स्थानी होता. यंदा भारताचे शेजारी पाकिस्तान (९९), बांगलादेश (८४), नेपाळ (८१) आणि आर्थिक अडचणीत असलेला श्रीलंका (६४) या देशांची स्थिती अधिक चांगली असल्याचेही अहवालात दर्शविण्यात आले आहे. याशिवाय भारताचा कुपोषणाचा दर जगात सर्वाधिक म्हणजे १९.३ टक्के नोंदविण्यात आला आहे. संपूर्ण जगात ८२.८ कोटी लोक कुपोषित असून त्यातील २२.४३ कोटी एकट्या भारतात आहेत, असे अहवालात म्हटले आहे. देशातील अल्पपोषणाचे प्रमाणदेखील वाढल्याचे अहवाल म्हणतो. २०१८-२०२० या काळात हे प्रमाण १४.६ टक्के एवढे होते. २०१९-२०२१मध्ये ते १६.३ टक्के झाल्याचे अहवालात आहे. अपूर्ण वाढ झालेल्या मुलांच्या जन्माचे प्रमाण आणि मुलांच्या मृत्यूदराचे प्रमाण घटल्याचा दिलासा देण्यात आला आहे. अपूर्ण वाढ झालेल्या मुलांच्या जन्माचे प्रमाण २०१२-१६मध्ये ३८.७ टक्के एवढे होते. ते २०१७-२१मध्ये ३५.५ टक्के झाल्याचे सांगण्यात आले आहे, तर मुलांच्या मृत्यूदराचे २०१४मध्ये असलेले ४.६ टक्के प्रमाण २०२०मध्ये ३.३ टक्के इतके कमी झाले आहे. वास्तविक पाहता वातावरणात सातत्याने होणारे बदल, कोरोना महामारी व त्यानंतर निर्माण झालेल्या समस्या, त्यातच पडलेली रशिया-युक्रेन युद्धाची भर यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर एकूणच परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. तरीही या सर्वांची झळ आपल्या देशाला मोठ्या प्रमाणात बसू नये यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सहकाऱ्यांनी वेळोवेळी उपाययोजना केलेल्या आहेत. अगदी कोरोना काळापासून सुरू केलेल्या योजना आजही सुरू आहेत. यापैकी एक म्हणजे अल्प भूधारक शेतकऱ्यांना वर्षातून तीन वेळा दोन दोन हजारांची आर्थिक मदत पीएम किसान सन्मान निधीच्या माध्यमातून देण्यात येते. कुपोषणमुक्तीसाठी तर यापूर्वीच महत्त्वपूर्ण पावले उचलली गेली आहेत. आपल्या देशात रस्त्यावर भीक मागणारे भिकारीसुद्धा मोठी संपत्ती जमवित असल्याचे त्यांच्या मृत्यूनंतर समोर आल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे उपासमारीत भारताला दिलेले स्थान न पटण्यासारखे आहे. यावर केंद्र सरकारनेही स्पष्टीकरण दिले आहे. महिला आणि बालकल्याण मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार अहवालासाठी वापरण्यात आलेले चारपैकी तीन निर्देशांक मुलांच्या आरोग्याशी संबंधित आहेत आणि ते संपूर्ण लोकसंख्येचे प्रतिनिधी असू शकत नाहीत. अहवालासाठी सहभागी करून घेण्यात आलेल्या लोकसंख्येवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. त्यामुळे चुकीच्या पद्धतीने भुकेचे मोजमाप करून ध्येय ठेवून वाटचाल करणाऱ्या भारताची प्रतिमा डागाळण्याचा हा प्रयत्न तर नाही ना अशी शंका येते.**

# ठिकठिकाणी पाणी अडविल्यास सर्वांची तहान भागेल!



आपल्या कोकणात भरपूर पाऊस पडतो आणि समुद्राला जाऊन मिळतो. यंदा तर पाऊस नको म्हणण्याची वेळ आली आहे. भातपीक उद्ध्वस्त होत आहे. इतका पाऊस पडत असला तरी ऐन पावसाळ्यात पाणीटंचाईला समोर जावे लागते ही शोकांतिका की तत्कालीन राज्यकर्त्यांचे अपयश आहे याचे आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे.

हल्ली कोकणात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडतो. यंदा तर परतीचा पाऊस लांबला आहे. तो अगदी जानेवारीपर्यंत लांबेल असा काही तज्ज्ञांनी अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे कदाचित पाणीटंचाई उशिरा येईल, परंतु आता हातातोंडाशी आलेले पीक वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पाऊस लांबला तर खूप प्रश्न निर्माण होतील. प्रामुख्याने कडधान्याचे पीक काढता येणार नाही. म्हणजे काहीही झाले तरी बळीराजा अडचणीतच असणार आहे.

आपल्या परिसराची भौगोलिक परिस्थिती चांगली आहे, पण तिचा नियोजनबद्ध उपयोग करून घ्यायची मानसिकता हवी आहे. खरेतर नदीच्या पात्रात ठराविक अंतरावर सुरुवातीला मातीचे बंधारे बांधून त्याचा अंदाज घेणे गरजेचे आहे. काही व्यावसायिक स्वखर्चाने नदीत मातीचे बंधारे बांधतात. इतकेच नव्हे तर सिमेंट बंधारेही त्यांनी बांधले आहेत. हे एखादी व्यक्ती करू शकते तर त्याला शासकीय यंत्रणेची जोड मिळाल्यास सारेच सुजलाम् सुफलाम् व्हायला वेळ लागणार नाही. त्यासाठी लोकसहभाग आणि लोकप्रतिनिधींचा प्रत्यक्ष पाठिंबा व सहकार्यही अपेक्षित आहे.

वासराच्या खोंड्यात जिल्हा परिषदेचे तत्कालीन बांधकाम सभापती पुंडलिक पाटील यांनी १९९४ साली कोल्हापूर टाईप बंधारे बांधण्याचा निर्णय घेतला. जिल्ह्यात अनेक ठिकाणी तसे बंधारे बांधण्यात आले होते, मात्र त्यांची दुरुस्ती कुणी करायची? निधी कुणी द्यायचा? देखभाल कुणी करायची? हे प्रश्न निर्माण झाले आणि कालांतराने हे बंधारे नादुरुस्त झाले आणि त्यामधील पाणीही गेले. त्या वेळी मोहिली गावाजवळ एक बंधारा बांधण्यात आला होता. सुरुवातीला काही वर्षे त्यातील पाणी राहिले व त्या परिसरातील लोकांची पाण्याची सोयसुद्धा झाली. एक-दोन गावांच्या पाणी योजनाही या बंधाऱ्यामुळे झाल्या होत्या, मात्र देखभाल, दुरुस्तीसाठी निधीचा प्रश्न उपस्थित झाला आणि आता या बंधाऱ्याचे अवशेष बघत राहण्यापलीकडे काहीही झाले नाही.

**खबरबात**
**विजय मांडे**

दोन-तीन ठिकाणी काही व्यावसायिकांनी पाणी अडविण्याचा प्रयत्न केला आणि तो यशस्वीसुद्धा झाला. त्याचे उदाहरण म्हणजे एका उद्योजकाने तमनाथ गावाजवळ सुरुवातीला दोन-तीन वर्षे मातीचा बंधारा बांधून पाणी अडविले. त्याचा उपयोग बऱ्याच जणांना झाला. त्यानंतर त्यांनी सिमेंटचा पण झडपांचा पक्का बंधारा स्वखर्चाने बांधला. त्यामुळे त्या भागात पुरेसे पाणी उपलब्ध झाले आहे. त्याच्याच पुढे शिरसे गावाजवळसुद्धा एक शासनाने बंधारा बांधल्यामुळे तेथेही पाण्याचा प्रश्न सुटला आहे. असेच बंधारे पोसरी गावाजवळसुद्धा बांधण्यात येत आहेत.



लोकप्रतिनिधींनी लक्ष दिले तर सारे काही ठीक होईल. कोंढाणे धरण गेल्या १० वर्षांपासून बांधण्यात येत आहे. यासाठी काही अडचणी आल्या. त्यातच स्थानिकांना अमुक टक्के पाणी सोडावे, हे धरण शासनाने बांधावे असे अनेक प्रश्न निर्माण झाले. त्याकरिता पायी दिंडी, मोर्चे, आंदोलने झाली, पण त्यातून काही ठोस मार्ग निघाला नाही. हे धरण झाले तर कर्जतचे रूप नक्कीच बदलेल. अनेक गावांच्या पाणी योजना होतील. अनेक हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल. असेच पोशिर धरणसुद्धा रखडले आहे. सुमारे तीस-पस्तीस वर्षे या धरणाची चर्चा आहे. प्रत्यक्षात ते कधी होईल? हे आज तरी सांगता येत नाही.

कर्जत शहराचा विकास इतक्या झपाट्याने झाला की २००६ साली तयार करण्यात आलेली वाढीव पाणीपुरवठा योजना २०३१ साली असलेल्या अपेक्षित लोकसंख्येसाठी केली होती, परंतु २०१६पासूनच या योजनेचे पाणी कर्जतकरांना कमी पडू लागले आहे. कोंढाणे धरण झाल्यास भौगोलिक परिस्थितीच्या आधारे अगदी कमी खर्चात कर्जत शहरासाठी चांगली पाणी योजना होऊ शकेल. त्याच प्रकारे योग्य नियोजन केल्यास अगदी गौरकामत परिसरातही हे पाणी जाऊ शकते. त्यासाठी सर्वांनी राजकीय जोडे बाजूला सारून एकत्र येऊन काम केले पाहिजे. तरच हे शक्य आहे. तोपर्यंत ज्या ज्या नद्या पावसाळ्यात वाहतात त्यांचे पाणी अडविणे गरजेचे आहे. तरच आपली तहान भागेल!



# लोकप्रिय अभिनेत्री स्मिता पाटील

**निमित्त**

आजच्या या लेखात आपण स्मिता पाटील या लोकप्रिय अभिनेत्री बद्दल माहिती घेणार आहोत. स्मिता पाटील या मराठी कन्या. महाराष्ट्रातील प्रसिद्ध मंत्र्याची मुलगी असल्यावरही त्यांच्यामध्ये अहंकाराचा लवलेश नव्हता, पण हिंदी चित्रपट सृष्टीतील त्यांची कारकीर्द वाखाणण्यासारखी आहे.



स्मिता पाटील यांचा जन्म १७ ऑक्टोबर १९५५ मध्ये पुण्यात झाला. पुण्यातीलच रेणुका स्वरूप मेमोरियल माध्यमिक शाळेतून त्यांचे शिक्षण झाले. त्यांच्या वडिलांचे नाव शिवाजीराव गिरधर पाटील एक राजकारणी होते. तर त्यांची आई समाजसेविका होत्या. स्मिता पाटील यांनी अभिनयाचे शिक्षण पुण्यामधील फिल्म रपव टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया येथून घेतले.

स्मिता पाटील यांनी सुरुवातीला दूरदर्शनवर वृत्त निवेदिका म्हणून काम केले. श्याम बेनेगल यांनी एकदा स्मिता यांना वृत्त निवेदन करतांना बघितले आणि त्यांच्यातील अभिनय क्षमता ओळखली. त्यांनी १९७५मध्ये स्मिता पाटील यांना पहिला ब्रेक दिला. चरण दास चोर या चित्रपटात रोल दिला आणि त्यांनीही संधीचे सोने केले. त्यांचा नैसर्गिक अभिनयाचे सगळीकडून कौतुक झाले. त्यानंतर त्यांनी कधीच मागे वळून बघितले नाही.

स्मिता या सहज अभिनय करण्यात त्या माहीर होत्या. ३१ वर्षाच्या काळात स्मिता पाटील यांनी तब्बल दोन दशक गाजवली. १९७७ हे वर्ष त्यांच्यासाठी मोलाचे ठरले. या वर्षात त्यांचे दोन चित्रपट आले. भूमिका आणि मंथन हे दोन्ही चित्रपट हिट झाले. कलात्मक चित्रपटातून त्यांना दिग्गज कलाकारांच्या सोबत काम करण्याच्या संधी मिळत गेल्या. स्मिता यांनी स्त्री प्रधान भूमिका जास्त केल्या. त्यांनी मराठी चित्रपटात सुद्धा आपले वेगळे स्थान निर्माण केले. उंबरठा आणि जैत रे जैत अशा वैशिष्ठ पूर्ण चित्रपटात त्यांनी काम केले. स्मिता पाटील यांनी व्यावसायिक चित्रपटही केलेत.

स्मिता पाटील एक सशक्त अभिनेत्री होत्या. १९७७ मध्ये भूमिका या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय फिल्म पुरस्कार मिळाला. १९८१ मध्ये त्यांना चक्र या चित्रपटासाठी पुन्हा एकदा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. १९८५ मध्ये त्यांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मानित केले. खूप कमी कालावधीतच त्यांनी अभिनयाच्या जोरावर तमाम हिंदी आणि मराठी चित्रपट सृष्टीचे लक्ष आपल्याकडे खेचले. बोलक्या डोळ्यांच्या स्मिताने प्रेक्षकांचीच नाही तर चित्रपट सृष्टीतील दिग्गज मंडळींची मने जिंकली, पण स्मिता पाटील या अल्पायुषी ठरल्या आणि राज बब्बर यांच्या सोबत विवाह झाल्यानंतर पहिल्याच बाळंतपणात त्यांचा मृत्यू १३ डिसेंबर १९८६ला झाला. त्यावेळी त्या फक्त ३१ वर्षाच्या होत्या.

**(साभार : हिस्टोरिकल टच)**

**क्लिक...क्लिक...!**



**उरण : दिवाळीपूर्वी मोठी जुई येथील शाळेत गडकिल्ले उपक्रमाला सुरुवात झाली आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी मातीचे गडकिल्ले तयार केले आहेत.** (छाया : विठ्ठल ममताबादे)

## बदलते तंत्रज्ञान

# फेसबूकवर सर्वाधिक ॲक्टिव्ह असणाऱ्यांनी 'या' चुका टाळाव्या!

झोपेतून उठल्यापासून ते अगदी दिवस संपताना पुन्हा झोपेपर्यंत सातत्यानं सध्याची पिढी मोबाईलसमोर असते. सध्याच्या काळात सर्वच वयोगटांमध्ये स्क्रीन टायमिंग अर्थात मोबाईल, संगणक किंवा तत्सम उपकरणांवर वेळ




घालवण्याला पसंती दिली जाते. असंख्य ॲप्स, सोशल मीडिया आणि इंटरनेटची उपलब्धता या साऱ्यामुळं टेकसॅव्ही होण्याकडेच अनेकांचा कल दिसतो. पण, प्रत्येकवेळी इतकं अपडेट असणंही धोक्याचं ठरतं. याची कारणं अनेक आहेत, पण आज आपण फेसबुक या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मला केंद्रस्थानी ठेवत आहोत. फेसबूकवर अनावधानानं काही अशा चुका होत असलीत ज्यामुळं तुमची रवानगी थेट कारागृहात होऊ शकते.

अनेक वेळा फेसबुक युजर्स नकळत काही चुका करतात. त्या चुकांचे पुढे जाऊन किती गंभीर परिणाम होऊ शक्तात याची त्यांना कल्पनाही नसते. शिवाय यामुळे ते कायदेशीर अडचणीत येऊ शकतात, त्यांना तुरुंगात जावे लागू शकते. तुम्हीही फेसबुकवर ॲक्टिव्ह असाल आणि विचार न करता कोणतीही ॲक्टिव्हिटी करत असाल तर तुम्हाला देखील जेलवारी घडू शकते. म्हणूनच हे माध्यम वापरतांना सावध राहणे आणि योग्य ती काळजी घेणे महत्वाचे आहे. अशाच काही चुकांबद्दल जाणून घेऊया ज्या तुम्हाला थेट तुरुंगात पाठवू शकतात.

**द्वेषयुक्त भाषण पोस्ट** - जर तुम्ही एखादी पोस्ट लिहिली असेल ज्यामध्ये एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या विरोधात अपमानास्पद भाषा वापरली गेली असेल तर अशा पोस्टवर आयटी नियमांनुसार कारवाई केली जाऊ शकते. ज्या व्यक्तीने ही पोस्ट केली आहे त्याला तुरुंगात जावे लागू शकते.

**आक्षेपार्ह फोटो** - जर तुम्ही एखाद्या व्यक्तीचे किंवा कोणत्याही संस्थेचे किंवा समाजाचे आक्षेपार्ह चित्र फेसबुकच्या माध्यमातून शेअर केले तर तुम्हाला तुरुंगात जावे लागू शकते किंवा कोर्टातही जावे लागू शकते. बहुतेक प्रकरणांमध्ये, फेसबुक स्वतःच असे कन्टेन्ट ब्लॉक करते, परंतु तसे न झाल्यास आणि एखाद्याला याबद्दल माहिती मिळाल्यास तो या प्रकरणाची तक्रार देखील करू शकतो, ज्यावर कारवाई केली जाते.

**विशिष्ट जातीविरुद्ध टीका** - एखाद्या विशिष्ट जाती किंवा समुदायाविरुद्ध शेरेबाजी केल्यास किंवा जात-विशिष्ट शब्द वापरल्यास अशा व्यक्तीवर कायदेशीर कारवाई होऊन त्यांना तुरुंगात जावे लागू शकते. म्हणूनच फेसबुकवर व्यक्त होताना काही गोष्टींचे भान ठेवणे खूप आवश्यक आहे.

## आरोग्य प्रहर

# राजगिऱ्याचे सेवन ठरेल आरोग्यदायी!

साधारणतः उपवासाच्या दिवशी आपण राजगिऱ्याच्या पदार्थांचा समावेश करतो. राजगिऱ्याचे लाडू, चिक्की असे पदार्थ उपवासाच्या दिवशी आपल्या पोटासाठी वरदान ठरतात, पण राजगिऱ्याचा फक्त उपवासाच्या दिवशीच



नाहीतर दररोजही आहारात समावेश करणे फायदेशीर ठरते. राजगिऱ्यामध्ये शरीराला आवश्यक असणाऱ्या अनेक पोषक तत्वांचा समावेश असतो. आज आम्ही तुम्हाला राजगिऱ्याच्या शरीराला होणाऱ्या विविध फायद्यांबाबत सांगणार आहोत. राजगिऱ्याला वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. राजगिऱ्याला रामदाना, अमरनाथ म्हणूनही ओळखतात. जाणून घेऊया राजगिऱ्याच्या आरोग्यदायी फायद्यांबाबत...

**हाडांसाठी फायदेशीर** - राजगिऱ्यामध्ये इतर धान्यांच्या तुलनेत तीन पटिंनी अधिक कॅल्शिअम असते. त्यामुळे याचा डाएटमध्ये समावेश केल्याने हाडे मजबुत होण्यास मदत होते. तसेच ऑस्टियोपोरोसिस यांसारख्या समस्या बळावण्याचा धोका कमी होतो.

**केसांच्या मजबुतीसाठी** - नियमितपणे राजगिऱ्याचा आहारात सामवेश केल्याने केसांच्या समस्या दूर होतात. यामध्ये मुबलक प्रमाणात लायसिन असते, जे केस दाट आणि मजबुत करण्यासाठी मदत करते. तसेच यामध्ये सिस्टीनही असते, जे केसांचे आरोग्य सुधारण्यासाठी मदत करते.

**पोषक तत्वांचा उत्तम स्त्रोत** - कॅल्शिअम व्यतिरिक्त आयर्न, मॅग्नेशिअम, पोटॅशिअम आणि फॉलिक ॲसिड यांसारखी पोषक तत्त्व राजगिऱ्यामध्ये मुबलक प्रमाणात असतात. यामध्ये विघटनशील फायबर, प्रोटीन आणि जिंक मुबलक प्रमाणात असते. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, यामध्ये कमी फॅट असतात.

**कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी करतो मदत** - राजगिऱ्याच्या बियांमध्ये फायटोस्टेरोल असते, जे कोलेस्ट्रॉल लेव्हल कमी करण्यासाठी मदत करते तसेच हे शरीरामधील शुगर लेव्हल नियंत्रणात ठेवते आणि ब्लड प्रेशर कंट्रोल करते.

**इन्फ्लामेशन कमी करतो** - राजगिऱ्यामध्ये पेप्टाइड्स असते, ज्यामुळे हे इन्फ्लामेशन आणि वेदना कमी करते. यामध्ये ॲन्टीऑक्सिडंट्सही असतात. जे शरीरातून फ्री रॅडिकल्स बाहेर टाकण्यासाठी मदत करतात.

राजगिऱ्याचा वापर तुम्ही पुडिंग, काकडी आणि दलियामध्येही करू शकता. तुम्ही या बिया पॉप करून स्नॅकच्या स्वरूपात खाऊ शकता. राजगिऱ्याच्या पिठामध्ये मल्टीग्रेन पिठासोबत एकत्र करून डाएटमध्ये समावेश करू शकता तसेच हे तुम्ही सलाडच्या स्वरूपातही खाऊ शकता.

# नवी मुंबई ते उरण प्रवास होणार जलद

## बेलापूर ते जेएनपीटी वॉटर टॅक्सीसेवा आजपासून सुरू

**नवी मुंबई, उरण : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील बेलापूर ते जेएनपीटी बंदर या समुद्री मार्गावर जलद प्रवासाकरीता वॉटर टॅक्सीसेवा सोमवार (दि. १७)पासून सुरू करण्यात येत आहे. या जलसेवेमुळे प्रवाशांना नवी मुंबई ते उरण हा प्रवास अवघ्या १५ मिनिटांत करता येणार आहे. या सेवेमुळे विनाअडथळा नवी मुंबईतून उरणला व उरणवरून नवी मुंबईत पोहचता येणार आहे.

या आरामदायी व वातानुकूलित प्रवासासाठी एकेरी फेरीला ३०० रुपये ते परतीच्या दुहेरी प्रवासा करीता ५०० रुपये मोजावे लागणार आहेत. त्याचप्रमाणे बेलापूर सकाळी ८.३०,१०.३०,१२.३०,२.३०.४.३०, व ६.३० तर जेएनपीटी वरून सकाळी ९.१५, ११.१५, १.१५, ३.१५, ५.१५ व ७.१५ वाजेपर्यंत ही सेवा सुरू राहणार आहे. या सेवेसाठी मासिक पासची ही सुविधा उपलब्ध आहे. यामध्ये एकूण ६० एकेरी फेरीसाठी दरमहा ६ हजार रुपये आकारण्यात येणार आहेत. या पासची संख्या मर्यादित असून केवळ २५० पास उपलब्ध आहेत.



समुद्री मार्गाने सुरू होणारी बेलापूर ते जेएनपीटी दरम्यानची जलसेवा ही सर्वसामान्य प्रवाशांना परवडणारी नसल्याच्या प्रतिक्रिया उरणमधील प्रवाशांनी व्यक्त केल्या आहेत. कारण रस्ता रुंदीकरणामुळे सध्या खाजगी वाहनाने उरण ते नवी मुंबई हा प्रवास अवघ्या २० मिनिटांत करता येत आहे. त्यासाठी एवढी रक्कम का मोजावी. तसेच बेलापूरवरून व जेएनपीटी जेट्टीपर्यंतचा प्रवास कसा करावा ही समस्या निर्माण होणार आहे. बेलापूर वरून सुरु करण्यात आलेल्या सर्व मार्गांवरील तिकीट दर हे मार्वसामान्यांच्या क्षमतेच्या बाहेरचेच आहे. वेळ आणि पैश्यांची बचत करण्यासाठी रोज लोकलच्या गर्दीतून प्रवास करणारा मुंबईचा चाकरमानी या एवढ्या महागड्या प्रवासासाठी तयार होईल याबाबत शंकांचे व्यक्त होत आहे. बेलापूर येथील भाजप आमदार मंदा म्हात्रे यांनीदेखील या जलप्रवासासाठी आकारण्यात येणाऱ्या तिकीट दराबाबत जाहीर नाराजी व्यक्त केली होती. सर्वसामान्यांच्या सोयीसाठी सुरु केलेल्या जलवाहतुकीचे तिकीट दर महागडे आहेत. जास्तीत जास्त नागरीकांनी या सेवेचा लाभ घेण्यासाठी सरकारने जलवाहतुकीचा तिकीट दर कमी करावा, अशी मागणी मंदा म्हात्रे यांच्याकडून करण्यात आली होती.

काही वर्षांपूर्वी याच जलमार्गावर वाशी, जेएनपीटी ते गेट वे ऑफ इंडिया अशी हावर क्राफ्ट सेवा सुरू केली होती. ही सेवा न परवडणारी असल्याने ती काही दिवसातच बंद करावी लागली होती. त्यामुळे नव्याने सुरू होत असलेली वॉटर टॅक्सी सेवेला प्रवाशांचा किती प्रतिसाद मिळतो ते पहावे लागणार आहे.

# परतीच्या पावसामुळे उभी भातपिके आडवी

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यात गेल्या आठवड्यात पडलेल्या परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या भातशेतीचे नुकसान झाले आहे. चिरनेर परिसरातील भातपिकांना या पावसाचा जास्त फटका बसला. जवळजवळ तासभर पडलेल्या पावसामुळे शिवारात उभे असलेले, परंतु कापणीला आलेले लोंब्यांचे भात पीक कोसळून पडले आहे. दुपारनंतर पाऊस हजेरी लावत असल्यामुळे तयार झालेल्या भात पिकांच्या कापणीचे काम लांबणीवर गेले आहे. चिरनेर परिसरात अनेक ठिकाणी शेतात भात पिके तयार झाली आहेत. तर सौरभ, तृप्ती, बासमती, गंगोत्री जातीची पिके अजून तयार होण्याच्या स्थितीत आहेत.

**चिरनेर परिसरात फटका**

चिरनेर गावातील दीपक पाटील, कृष्णा म्हात्रे तसेच अन्य शेतकऱ्यांच्या शिवारातील सौरभ व अन्य जातीची अनेक नवीन पिके अजून तयार होण्याच्या स्थितीत आहेत. शिवाय या पिकांची उंची आणि वाढ मोठ्या प्रमाणावर झाली असल्यामुळे, पावसासोबत आलेल्या वाऱ्याबरोबर ही भात पिके शेतात कोसळून पडली आहेत. त्यामुळे या शेतकऱ्यांच्या हाताला गुरांसाठी यंदा वैरण येईल की नाही, हे सांगता येत नाही.



# पाले खुर्द येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दीपक फर्टीलायझर्स अ‍ॅण्ड पेट्रोकेमिकल्स कोर्पोरेशन लिमिटेड यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत ईशान्य फाउंडेशन व लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. १५) पाले खुर्द येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.

या शिबिरास तळोजा विभागातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण ३३१ रुग्णांची प्राथमिक तपासणी करण्यात आली. यातील १६० रुग्णांना मोतीबिंदू असल्याचे निदान झाले. त्यांचे ऑपरेशन पनवेल येथील प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ. सुहास हळदीपूरकर यांच्या लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल येथे दीपक फर्टिलायझर मार्फत मोफत केले जाणार आहे. तसेच ९६ रुग्णांना दृष्टी दोष असल्याचे निदान झाले असून या रुग्णांना दीपक फर्टिलायझर्स मार्फत अल्प दरात चष्मे वाटप करण्यात येणार आहेत.शिबिराचे उद्घाटन पल्लवी




नरेश मेहता तसेच एव्हीपी कॉर्पोरेट अफेयर्स अरुण शिर्के, एजीएम-बॅगिंग देवेंद्र कदम यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले.

कार्यक्रमाच्या वेळी दीपक फर्टिलायझरच्या सीएसआरचे सिनिअर मॅनेजर संदीप काकडे, ईशान्य फाउंडेशनचे प्रकल्प व्यवस्थापक योगेश पाटील व टीमने शिबिराचे नियोजन केले. आबा पाचघरे व नेत्रचिकित्सक टीम लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल यांनी नेत्र तपासणी केली.

# जय गोपीनाथ प्रतिष्ठानच्या रायगड जिल्हाध्यक्षपदी रामदास सांगळेंची निवड

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

जय गोपीनाथ प्रतिष्ठानच्या रायगड जिल्हाध्यक्षपदी नवउद्योजक रामदास सांगळे यांची निवड करण्यात आली. या वेळी संस्थेचे प्रमुख मार्गदर्शक व भाजप भटके विमुक्त सेलचे जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, व्यापारी सेलचे कळंबोली अध्यक्ष कमल कोठारी, जय गोपीनाथ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुभाष आंधळे, उपाध्यक्ष आनंद ठोंबरे, सचिव हनुमंत विघ्ने उपस्थित होते.



रायगड जिल्हाध्यक्ष पदावर नियुक्ती केल्याबद्दल रामदास सांगळे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. जय गोपीनाथ प्रतिष्ठान ही संस्था राज्यभर वेगवेगळे समाजोपयोगी कार्यक्रम राबविते. रायगड जिल्ह्यामध्ये ही जबाबदारी नवउद्योजक रामदास सांगळे यांच्यावर सोपविण्यात आली आहे व ही जबाबदारी मी माझ्या कार्य कुशलतेने व्यवस्थित पार पाडेल, असे रामदास सांगळे यांनी या वेळी म्हटले आहे.

# केबीपी कॉलेजमध्ये वाचन प्रेरणा दिन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये (केबीपी) वाचन प्रेरणा दिन समारंभ झाला. ग्रंथालय व साहित्यमंच समितीच्यावतीने वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून 'एक पान प्रतिभेचं' हा अभिवाचनाचा उपक्रम विद्यार्थी व शिक्षक यांच्या सहभागाने झाला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्तुत कार्यक्रमाचे व उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपप्राचार्या डॉ. राजेश्री घोरपडे यांच्या हस्ते एक पान प्रतिभेचं या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. घोरपडे यांनी सहभागी वाचकांना मानवी जीवनातील ग्रंथाचे महत्त्व, सामर्थ्य व उपयुक्तता याविषयीची जाणीव करून दिली तसेच त्यांनी त्यांच्या आवडलेल्या ग्रंथाचे एक पान स्वलिखित भाष्य प्रकट



केले. या उपक्रमात एकूण ३० विद्यार्थी व शिक्षक यांनी सहभाग नोंदवला तर ज्युनियर विभागातील सर्व विद्यार्थ्यांसाठी एक तास वाचनाचा हा उपक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमाला वाणिज्य विभागाच्या अधिष्ठाता डॉ. हर्षा गोयल, डॉ. अर्चना चव्हाण, प्रा. पूनम रावले, प्रा. अपूर्वा देशमुख व प्रा. सुजाता पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल मानसी रसाळ यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. आबासाहेब सरवदे यांनी मानले.

# 'मिशन वात्सल्य'कडून विहिघर, नेरे येथे शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

मिशन वात्सल्य समिती, पनवेल मार्फत नेरे प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येणाऱ्या सर्व गावांमधील एकल विधवा महिलांना शासकीय योजनेचा लाभ देण्यासाठी विहीघर-नेरे येथे प्राथमिक शाळेच्या सभागृहामध्ये तहसीलदार तथा अध्यक्ष, मिशन वात्सल्य समिती यांच्या अध्यक्षतेखाली शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये कोविड-१९ या विषाणूमुळे विधवा झालेल्या नोंदीत ३७ महिलांपैकी ३४ महिला शिबिराला उपस्थित होत्या. उपस्थित सर्व महिलांना शासनाच्या



सर्व योजनांबाबत तहसीलदार यांनी मार्गदर्शन केले. तसेच आवश्यक ते कागदपत्र प्राप्त करून घेऊन योजनेसाठी पात्र असणाऱ्या एकल विधवा महिलांकडून विविध योजनांचे अर्ज भरून घेण्यात आले. तहसीलदार यांनी विधवा महिलांशी वैयक्तीकरित्या संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच मिशन वात्सल्य योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी युवा संस्थेमार्फत तयार करण्यात आलेल्या जिंगल्स व पत्रिकेचे अनावरण तहसीलदार यांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबिरासाठी तहसीलदार विजय तळेकर, बाल विकास प्रकल्प अधिकारी चेतन गायकवाड, विस्तार अधिकारी वैशाली वैदू, आदिवासी विकास विभाग - पेण अधिकारी प्रकाश सोळसकर वात्सल्य, समिती सदस्य अल्लाउद्दिन शेख, युवा सामाजिक संस्थेचे एन.जी.ओ. चेतन वाघ व त्यांचे प्रतिनिधी, ग्रामसेवक, तलाठी, संबंधीत बीटाच्या अंगणवाडी पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मदतनीस आदी उपस्थित होते.

# आम्ही पिरकोनकर समुहातर्फे गडकिल्ले प्रतिकृती स्पर्धा

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जपण्याचा ध्यास मुलांमध्ये निर्माण व्हावा यासाठी उरण तालुकास्तरीय गडकिल्ले प्रतिकृती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. उरण तालुक्यातील पिरकोन येथील आम्ही पिरकोनकर समूह या समूहाच्या माध्यमातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेसाठी काही नियम व अटी ठेवण्यात आल्या आहेत. यात रेडीमेड किल्ल्यांचा वापर करता येणार नाही तसेच स्पर्धेत भाग घेण्यासाठी स्पर्धकांना २० ऑक्टोबरपूर्वी नोंदणी करावी लागेल ही नोंदणी प्रत्यक्ष भेटून अथवा व्हॉट्सअॅपद्वारे करावी. तर २३ ऑक्टोबर रोजी किल्ला परीक्षणासाठी तयार केलेला असावा. विजेत्यांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल तसेच सहभागी स्पर्धकांनाही प्रमाणपत्र देण्यात येईल स्पर्धेसाठी कोणतेही साहित्य आयोजकांकडून पुरविले जाणार नाही इको फ्रेंडली किल्ल्यांना अधिक प्राधान्य देण्यात येईल. किल्ल्यासाठी योग्य जागा स्पर्धकांनी निवडावी.

स्पर्धेसाठी किल्ला तयार करताना एक किंवा त्याहून अधिक स्पर्धकांना एकत्रितपणे काम करण्याची मुभा देण्यात आली आहे. किल्ल्याबाबत सविस्तर माहिती असणे आवश्यक आहे तसेच किल्ल्या शेजारी स्पर्धकांनी आपल्या गटाचे व किल्ल्याचे नाव नमूद करावे तसेच गटाच व ग्रुपमधील सभासदांची संख्या व माहिती देणे आवश्यक आहे जेणेकरून त्यामधील इतिहास परीक्षकांसमोर उभा राहील या स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी चेतन गावंड ९८१९७५९१०५, गिरीश पाटील ९८७०४२९६७७, तुषार म्हात्रे ९८२०३४४३९४, दिलखुश पाटील ९५९४९३७४२४, राजेंद्र ठाकूर ९८७० ६९८६४४, सुरेंद्र गावंड ९९३० १८४७६६, समीर गावंड ९८२०८४८१५६, भूषण गावंड९५९४८७२४७८, हेमंत गावंड ९५९४३६३४८२, मनोहर म्हात्रे७२०८१८३१७६, प्रमोद पाटील ९१६७२३ ०११३, रवींद्र गावंड ९९२० ६९२२२१, राकेश गावंड९१६७ ४८२०७०, विनायक गावंड ९०७६ ३७१५६३ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# द्रोणागिरी विद्यालयात जागतिक हात धुवा दिवस



**उरण : वार्ताहर**

द्रोणागिरी हायस्कूल इंग्रजी माध्यम करंजा विद्यालयात शनिवारी (दि. १५) जागतिक हात धुवा दिवस साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका प्रभू यांनी प्रथम सर्व विद्यार्थ्यांना हात कसे धुवावेत याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

प्रत्येक विद्यार्थ्यांने या दिवशी आपले हात योग्य पद्धतीने कसे धुवावेत हे अजमावून घेतले आणि त्यानुसार आपले हात धुवून घेतले. विद्यालयाच्या प्रत्येक मजल्यावर वॉश बेसिनची सोय असल्याने नेहमीच त्या ठिकाणी साबण ठेवलेले असते. त्याप्रमाणे आजच्या दिवशीही तशी व्यवस्था केली होती. या उपक्रमात शिक्षकही सहभागी झाले होते.

उपक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापिका प्रभू यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या दिवसानिमित्त विद्यालयात चित्रकला, रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात विद्यालयातील शिक्षक गण व इयत्ता पहिली ते दहावीचे ६६१ विद्यार्थी सहभागी झाले होते.



# खोपोलीतील वाहतूक कोंडी समस्या जटील

## वाट काढणे झाले कठीण, शिळफाट्यावर उड्डाणपुलाची गरज

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका क्षेत्रातील शिळफाटा शासकीय गेस्टहाऊस ते इंदिरा गांधी चौक, खोपोली मुख्य बाजारपेठ, दीपक चौक, समाज मंदिर रोड येथे वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. त्यामुळे नागरिक हैराण झाले असून वाहतूक कोंडीवर तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.

शिळफाटा येथील वाहतूक समस्येच्या प्रमुख कारणांपैकी रस्त्यावर उभी करण्यात येणारी खासगी वाहने व बसस्थानकातील एसटी बसेसची वर्दळ हे आहे. बसस्थानक शहराच्या बाहेर स्थलांतरित होणे, रस्ता रुंदीकरण किंवा या अंतरात उड्डाणपुलाची निर्मिती हे प्रभावी पर्याय असल्याने यासंदर्भात तातडीने कार्यवाही होण्याची मागणी करण्यात येत आहे.


(छाया : विनायक माडये)

दुसरीकडे खोपोली शहरातील विविध व्यापारी संकुलात वाहनतळ सुविधा नाही. बाजारपेठ व इतर महत्त्वाच्या रस्त्यांवर हातगाड्या व फेरीवाल्यांनी आपले बस्तान मांडले आहे, तसेच खासगी वाहने व मालवाहतूक करणारी मोठी वाहनेही मुख्य रस्त्यांवर उभी करण्यात येत आहेत. त्यामुळे रस्ते अडविले जात असून, या ठिकाणी पायी चालणाऱ्यांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. पोलिसांकडून नियमबाह्य वाहने पार्किंग विरोधात कारवाई होत असली तरी अतिक्रमणे, अनधिकृत फेरीवाले व हातगाडीधारकांविरोधात मात्र प्रभावीपणे कारवाई होत नसल्याने येथील कोंडी जटील समस्या बनली आहे.

व्यापारी संकुले व बहुमजली रहिवासी इमारतींना बांधकाम परवाना देतांना वाहनतळ निर्मितीची अट खोपोलीत पाळली जात नाही. त्यामुळेच अनेकांची वाहने ही रस्त्याच्या कडेला उभी केलेली पहायला मिळतात. सद्यस्थितीत वाहनसंख्या वाढल्याने रस्ते वाहनांच्या पार्किंगने गिळंकृत केले आहेत.

समाजमंदिर रोड, बाजारपेठ, शास्त्रीनगर, रेल्वे स्टेशन रोड, शिळफाटा व इंदिरा गांधी चौक या कायम रहदारी असलेल्या रस्त्यांवर कायम वाहतूक कोंडी होऊन चालणेही कठीण बनले आहे.

**बाजारपेठेमध्ये वाहतूक कोंडीची समस्या आहे. नगरपालिकेकडून यासाठी विविध उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. बाजारपेठेजवळ पे अँड पार्किंगची व्यवस्था निर्माण करण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत.**

**-अनुप दुरे-पाटील, मुख्याधिकारी, खोपोली**

**शहरातील वाहतूक कोंडीबाबत अनेक वेळा चर्चा झाल्या आहेत. प्रभावी उपाययोजना मात्र अमलात आणल्या जात नाहीत. एकतर्फी वाहतूक व गर्दीच्या वेळी मालवाहतूक वाहनांना मनाई बाबतही कठोर अंमलबजावणी होत नाही.**

**-कुलदीपक शेंडे, माजी उपनगराध्यक्ष, खोपोली**

**टोईंग वाहनाद्वारे नियमबाह्य वाहने पार्किंग वर दंडात्मक कारवाई केली जाते. अतिरिक्त वाहतूक पोलिसही तैनात ठेवण्यात आले आहेत. शिळफाटा येथील वाहतूक समस्या सोडवण्यासाठी प्रभावीपणे धोरणात्मक योजना होण्याची आवश्यकता आहे.**

**-शिरीष पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खोपोली**

# कर्जतमध्ये गृहोपयोगी उत्पादनांचे प्रदर्शन


(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील सखी ग्रुप आयोजित गृहोपयोगी उत्पादनांचे भव्य प्रदर्शन रविवारी (दि. १६) शनि मंदिराच्या रविकिरण सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी सखी ग्रुपच्या मिना प्रभाळकर, वनिता सोनी, तन्वी जोशी, कविता राठी, प्रज्ञा परांजपे, सपना शहा उपस्थित होत्या. प्रदर्शनात एकूण २५ महिलांनी आपापले स्टॉल मांडले होते. फॅन्सी दागिने, साड्या, ड्रेस मटेरिअल, पूजेच्या वस्तू, विविध पर्सेस, घर सजावटीच्या वस्तू, सौंदर्य प्रसाधने आणि विविध खाद्यपदार्थ असे गृहोपयोगी वस्तूंचे स्टॉल या प्रदर्शनात पहायला मिळाले.

सर्वांची अशीच साथ लाभल्यास भविष्यात अशी अधिकाधिक प्रदर्शने भरवून महिला उद्योजिकांना सक्षम व्यवसायासाठी संधी उपलब्ध करून देण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.

# पेणमध्ये रस्तेविषयक मागण्यांसाठी आंदोलन

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील रस्तेविषयक समस्यांची सोडवणूक करावी यासाठी रविवारी (दि. १६) महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. माझं पेण विकास समितीच्या माध्यमातून हे आंदोलन झाले.

आंदोलनात नगराध्यक्ष प्रितम पाटील, समितीचे अध्यक्ष राजू पाटील, दिलीप पाटील, दीपश्री पोटफोडे, समिता पाटील, मोहिनी गोरे, वसुधा पाटील, स्वरूप घोसाळकर, राजू म्हात्रे, अ‍ॅड. प्रवीण पाटील, दिलीप जोग, अ‍ॅड. अजय उपाध्ये, अशोक मोकल, नरेश गावंड, सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, अमोद मुंढे, अजय कदम, अविनाश म्हात्रे, ललित पाटील, प्रदीप वर्तक, समाधान पाटील, पारिजात वनगे, डॉ. चेतन म्हात्रे, भाऊ मुजावर,


(छाया : अनिस मनियार)

नरेश गावंड, नरेंद्र ठाकूर, काशिनाथ पाटील संजय पाटील, नरेन जाधव, नागेश सुर्वे, सुशील कोठेकर, मेघना चव्हाण, राजेश मनोरे, महेश पाटील आदींसह नागरिकांनी सहभाग नोंदवला.

या वेळी आंदोलकांनी पेण शहराकडून अलिबागकडे जाताना ओव्हर ब्रिजवर चढण्याकरिता बनविलेल्या मार्गाची दिशा बदलून शहराच्या कमानीकडून तो ओव्हरब्रिजला जोडावा, वाशी नाका येथे उड्डाणपूल बांधावा, गडब येथे खांब्यावर आधारित उड्डाणपूल बांधावा, पेण येथील ओव्हरब्रिज पूर्णपणे काढून पेण (पशुसंवर्धन) ते रामवाडी पार करणारा खांब्यांवर आधारित उड्डाणपूल बांधावा, मार्गावरील सर्व त्रुटींची पूर्तता होत नाही तोपर्यंत कोणत्याही प्रकार टोल नाका सुरू करू नये आदी मागण्या करण्यात आल्या.

महामार्गाचे अधिकारी यशवंत कोठेकर यांनी आंदोलकांची भेट घेत प्रलंबित कामे मार्गी लावण्याचे लेखी पत्र राजू पाटील यांनी दिले, पण आंदोलकांचे यावर समाधान झाले नाही. त्यामुळे प्रांत कार्यालयात तत्काळ बैठकीचे आयोजन करण्यात आले. या वेळी पुढच्या महिन्यापर्यंत खड्डे भरण्यात येतील तसेच गडब व वाशी नाका येथील उड्डाणपुलासंदर्भात शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार असून अन्य मागण्यासंदर्भात प्रस्तावही पाठविण्यात आले असल्याचे सांगण्यात आले.

# शिहू शाळेत जागतिक हात धुवा दिन साजरा

**नागोठणे : प्रतिनिधी**

येथील प्राथमिक शाळा शिहू, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालय येथे शनिवारी (दि. १५) जागतिक हात धुवा दिन साजरा करण्यात आला.

स्वच्छ भारत मिशन या अभियानांतर्गत येणाऱ्या स्वच्छतेच्या विविध कार्यक्रमांपैकी हात धुणे हा एक महत्त्वाचा भाग आहे. सुदृढ, निरोगी व आनंददायी जीवनासाठी जागतिक स्तरावर हा दिन साजरा केला जातो. शालेय विद्यार्थांमध्ये हातांच्या स्वच्छतेचे बीज रुजवणे हा या मागचा प्रमुख उद्देश आहे, कारण लहान मुलांमध्ये


(छाया : राज वैशंपायन)

मुळातच स्वच्छतेबाबत फारशी जागरूकता नसते हे टाळण्यासाठी येथील मुख्याध्यापक जीवन ठाकूर यांनी शालेय विद्यार्थ्यांना हात धुण्याचे महत्त्व व त्याचे आरोग्यास होणारे लाभ याबाबत माहिती दिली, तर सहशिक्षिका सुप्रिया पिंगले, संगीता बहिरशेठ, माने, अंगणवाडी सेविका मीना घासे, जयश्री म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके करून दाखवली.

# अंजुमन इस्लाम कॉलेजमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स येथे ग्रंथालय समितीतर्फे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंतीनिमित्त शनिवारी (दि. १५) वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

महाविद्यालयातील ग्रंथालयात सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्यावर आधारित पुस्तकांचे वाचन केले. हा उपक्रम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. ग्रंथपाल प्राचार्य अंजुम दाखवे व ग्रंथालय समिती यांच्या विशेष प्रयत्नांनी उपक्रम यशस्वी झाला.


(छाया : संजय करडे)

# तळई शाळेतील आदिवासी विद्यार्थी घेणार डिजिटल शिक्षण

## प्रगती फाउंडेशनचा उपक्रम

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील राजिप शाळा तळई येथे आदिवासी विद्यार्थ्यांना ऑडिओ-व्हिडिओ माध्यमातून शिक्षण मिळावे यासाठी प्रगती फाउंडेशनतर्फे नुकतीच दृक्श्राव्य लॅब उभारण्यात आली आहे. यामुळे येथील विद्यार्थ्यांचे अध्ययन, अध्यापन अधिक सखोल, मनोरंजक व क्रियाशील होणार आहे.

शाळेला ४३ इंच स्मार्ट टीव्ही संच, चार वॉल फॅन आणि १० खुर्चा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या वेळी विद्यार्थ्यांना ज्युस व खाऊचे वाटपदेखील करण्यात आले.

ही ऑडिओ-व्हिडिओ लॅब उभारण्याकरिता जया पुनवानी व हरीहर पुत्र भजन समाज यांचे सहकार्य लाभले. हा उपक्रम प्रो. आर. एस. एस. मणी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक बालाजी राठोड यांनी जया पूनवानी आणि प्रगती फाउंडेशनचे अध्यक्ष किरण राणे यांचे आभार मानले व ग्रामीण भागातली विद्यार्थ्यांना शैक्षणिक विकास साधण्यासाठी या उपक्रमाचा लाभ होणार असल्याची भावना व्यक्त केली.



प्रगती फाउंडेशन माझा गाव, माझा अभिमान या प्रकल्पांतर्गत ग्रामीण आणि आदिवासी दुर्गम भागांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी सीएसआर फंड व देणगीदारांच्या सहकार्याने शाळांना सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात काही महिन्यांपूर्वी आयव्हीआय आणि बी फोर यु सीएसआर प्रकल्प अंतर्गत संगणक संच, सोलार पॅनल आणि वॉटर फिल्टर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

# इंदापुरात रंगली साहित्याची मुक्त मैफिल

**माणगाव : प्रतिनिधी**

माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे जयंतीनिमित्ताने व वाचन प्रेरणा दिनाचे औचित्याने कोकण मराठी साहित्य परिषद शाखा तळाचे वतीने शनिवारी (दि. १५) इंदापूर येथे मुक्त साहित्य मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कथा, कविता, चारोळी, अभिवाचन या साहित्यप्रकारात सर्व रसिकश्रोते चिंब झाले.


(छाया : सलीम शेख)

व्यासपिठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष कोमसाप तळाचे उपाध्यक्ष भरत जोशी तर प्रमुख पाहुणे रायगड जिल्हा कार्यवाह तथा माणगाव शाखा अध्यक्ष अजित शेडगे व तळा शाखाध्यक्ष हेमंत बारटक्के उपस्थित होते.

मान्यवरांचे हस्ते दिपप्रज्वलन, डॉ. कलामांचे प्रतिमापूजन व ग्रंथपूजन करून उद्घाटन करण्यात आले. अध्यक्ष हेमंत बारटक्के यांनी डॉ. कलामांचे काही प्रेरक दाखले देऊन शाखेने राबविलेल्या उपक्रमांचे विवेचन करून उपस्थितांचे स्वागत केले. शाखेच्या सहसचिव उल्का माडेकर यांनीही मनोगत व्यक्त केले. त्यानंतर सर्वांनी आपल्या साहित्याचे सादरीकरण केले. शिल्पा मोहिते, पुष्पा चांदवले, चंदन दोशी, बाळकृष्ण मेथा, सौ.मेथा, बाबाजी धोत्रे, बाबुराव कांबळे, गणेश साळवी, पारस माळी, संदेश शिंदे, संदिप जामकर, परेश जाधव, श्रेयश रोडे, रघुनाथ पोवार, राम जगदाळे, उल्का माडेकर, हेमंत बारटक्के, श्रुती माडेकर यांनी रसिकांची वाहवा मिळवली.

प्रमुख पाहुणे अजित शेडगे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, तळा व माणगाव शाखा या परस्परांच्या भगिनी असून आपण अशाच संयुक्त उपक्रमातून आपल्यातले ऋणानुबंध अधिक दृढ करूया असे सांगून कलामांनी आयुष्यभर पुस्तकांशी मैत्री करून आपले जीवन समृद्ध केले, असे सांगून आपली स्वरचित 'वात' ही रचना सादर केली. अध्यक्षीय मनोगतात भरत जोशी यांनी अब्दुल कलामांचे काही किस्से सांगून त्यांचा आदर्श प्रत्येकाने घ्यावा असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे निवेदन प्रा. प्रणय इंगळे यांनी तर आभारप्रदर्शन हेमंत बारटक्के यांनी केले.

# प्राथमिक शिक्षक परिषदेच्या मुरूड तालुकाध्यक्षपदी राजेंद्र नाईक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुका प्राथमिक शिक्षक कार्यकारणी निवड सभा मांडला राजिप शाळेत शनिवारी (दि. १५) घेण्यात आली. या वेळी मुरूड तालुका अध्यक्षपदी राजेंद्र नाईक यांची एकमताने निवड झाली असून उपाध्यक्षपदी चेतन चव्हाण,


(छाया : महेंद्र खैरे)

कार्याध्यक्षपदी भास्कर साळावकर, संघटनमंत्री देवानंद गोगर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. राज्य शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांचेसह जितेंद्र बोंडके यांच्या प्रमुख उपस्थितीसह व्यासपिठावर राजेंद्र नाईक, भास्कर साळावकर, देवानंद गोगर आदी व तालुक्यातील ५० प्राथमिक शिक्षक उपस्थित होते.

राजेंद्र नाईक यांनी प्रारंभी संघटनेने केलेल्या विविध कामांची माहिती दिली. यानंतर मुरूड तालुका कार्यकारणी निवड प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली. मुरूड तालुका कोषाध्यक्ष शरद पाटील, सचिव जगदीश चवरकर, प्रसिद्धी प्रमुख राजेंद्र साळावकर, महिला प्रतिनिधी रेश्मा धुमाळ, सिमा नागावकर, रूपाली वाजंत्री, प्राजक्ता पाटील, वळके केंद्र प्रतिनिधी हेमंत म्हात्रे, मांडला प्रतिनिधी अभिजीत लाड, बोर्ली गणेश कमळनाखवा, नांदगाव राजेंद्र बुल्लू, आगरदांडा बालाजी वडवले, उर्दु प्रतिनिधी इर्षाद बैरागदार यांची निवड करण्यात आली.

(छाया : महादेव सरसंबे)



**रोहा : जागतिक वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्ताने रायगड जिल्हा पत्रकार संघटनेच्या वतीने सतीश कुलकर्णी, तळेकर बंधू, श्रीनिवास सातामकर, चिंतामणी खरीवले या वृत्तपत्र विक्रेत्यांना सन्मानित करण्यात आले. या वेळी रोहा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष विजय देसाई, संघटनेचे अध्यक्ष महादेव सरसंबे, कार्याध्यक्ष जितेंद्र जोशी, महेंद्र मोरे, अमोल पेणकर, नितीश सकपाळ आदी उपस्थित होते.**

# आरोग्य महाशिबिर





















## प्रथम पुण्यस्मरण



**कै. सौ. डॉ. पौर्णिमा घन:शाम म्हात्रे**

देवाज्ञा दि. २८/१०/२०२१
तिथीप्रमाणे अश्विन कृ. सप्तमी
सोमवार, दिनांक १७/१०/२०२२

तुझी आठवण येत नाही असा एकही क्षण नाही.
सहवास जरी नसला तरी, स्मृती सुगंध देत राहतील.
जीवनाच्या प्रत्येक वळणावर, आठवण तुझी येत राहील.
तुझ्या आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

आपले विनित
घन:श्याम म्हात्रे (पती)
अनुष्का व अव्यग्र (मुले)
किरण, रोहित, समिक्षा, सिद्धांत, ओवी (पुतणे)





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com